0 5 MAY 2022 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहूंच्या कर्तृत्वावर आज १०० ठिकाणी व्याख्याने

## मुख्य व्याख्यान शिवाजी विद्यापीठात : सायंकाळी कँडल मार्चचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त आज गुरुवारी सकाळी ११ वाजता जिल्ह्यात 'जागर शाहू कर्तृत्वाचा' या विषयावर राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जीवनकार्याविषयी शंभर व्याख्याने जिल्ह्यात होणार आहेत. विवकानंद महाविद्यालयात पालकमंत्री सतेज पाटील यांचे व्याख्यान होईल.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात होणार ख्यातनाम अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंत थोरात हे यावेळी 'राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य' या विषयावर मुख्य व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार असतील.कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे रुकडी येथील राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयात व्याख्यान देणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील हे चंदगड येथील आर.बी. माडखोलकर महाविद्यालयात विचार मांडतील. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे कराडमधील एस. जी. एम. कॉलेजमध्ये शाहू राजांबद्दल आपले विचार व्यक्त करणार आहेत.

### सायंकाळी ७ वाजता कँडल मार्च

समतेचा संदेश देणाऱ्या शाहू महाराजांच्या स्मृतीला अभिवादन करीत पूर्वसंध्येला आज सायंकाळी ७ वाजता दसरा चौक ते शाहू समाधी स्थळ या मार्गावर कँडल मार्च काढण्यात येणार आहे. या कँडल मार्चमध्ये शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या सर्व समाजाच्या बोर्डिंगमधील विद्यार्थी उपस्थित असणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
0 5 MAY 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशभरात आज शाहू विचारांचा जागर

## 'जागर शाहू कर्तृत्वाचा' विषयावर शंभरहून अधिक ठिकाणी व्याख्याने

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त गुरुवारी (दि. ५) देशभरात शाहूंच्या विचारांचा जागर होणार आहे. राज्यासह देशातील अनेक ठिकाणी उद्या सकाळी ११ वाजता 'जागर शाहू कर्तृत्वाचा' या विषयावर राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जीवनकार्याविषयी एकाच वेळी शंभरहून अधिक ठिकाणी व्याख्यानांचे आयोजन केले आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगाव, पुणे, अहमदनगर, मुंबई, नाशिक यासह दिल्ली, उत्तर प्रदेश, राजकोट, सिक्कीम आदी शंभरहून अधिक ठिकाणी ही व्याख्याने होणार आहेत. शाहू महाराज यांचे कार्य आणि योगदान लोकांना कळावे खास करून विद्यार्थ्यांच्या मनात शाहूंचे विचार रुजावेत यासाठी कृतज्ञता पर्वानिमित्त हा अनोखा उपक्रम आयोजित केला आहे.

कोल्हापुरात विवेकानंद महाविद्यालयात पालकमंत्री सतेज पाटील यांचे व्याख्यान होईल. या व्याख्यानमालेतील मुख्य व्याख्यान शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात होणार आहे. ख्यातनाम अर्थ व कृषी तज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात हे 'राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य' या विषयावर व्याख्यान देणार असून ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. श्री शाहू छत्रपती महाराज, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने सकाळी ११ वाजता आयोजित या विशेष व्याख्यानमालेत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के रुकडी येथील राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराजांच्या योगदानाविषयी व्याख्यान देणार आहेत. तर प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील हे चंदगड येथील आर.बी. माडखोलकर महाविद्यालयात व्याख्यान देणार आहेत. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे कराडमधील एस. जी. एम कॉलेजमध्ये शाहू राजांबद्दल आपले विचार व्यक्त करणार आहेत.

राज्य शासनाचा शिक्षण विभाग, रयत शिक्षण संस्था, शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालये, कोल्हापूर महापालिका, जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा, महाविद्यालयांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या व्याख्यानास शाहूप्रेमी, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी केले.

लोकसत्ता



# विद्यापीठ स्तरावर बहर महोत्सव

## उच्च शिक्षण विभागातर्फे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये आयोजन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे विद्यापीठ स्तरावर कला आणि क्रीडाच्या विविध स्पर्धांचा समावेश असलेला 'बहर' हा महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. त्यात नोव्हेंबरमध्ये क्रीडा स्पर्धा आणि डिसेंबरमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम होतील.

उच्च आणि तंत्रशिक्षण विभागातर्फे या संदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. या महोत्सवाच्या नियोजन आणि अंमलबजावणीसाठी समिती नियुक्त करण्यात आली आहे. तंत्रशिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखालील या समितीमध्ये तंत्रशिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालयाचे सहायक संचालक (लेखा), उच्च शिक्षण सहसंचालक आणि अंकित प्रभू हे अशासकीय सदस्य यांचा समावेश आहे.

### आयोजन का?

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या औचित्याने राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कला आणि क्रीडा गुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी हा महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे.

या समितीच्या अंतर्गत विभागीय समित्यांची नियुक्ती करून महाविद्यालयातील कार्यक्रम, खेळांची निवड करण्यात येईल. तर मुख्य समितीकडून महोत्सवाची रूपरेषा, कार्यक्रमनिहाय दिनदर्शिका ठरवली जाईल. विद्यापीठ स्तरावरील महोत्सवासह पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी युवा महोत्सवाच्या आयोजनासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने युवा महोत्सव आयोजित करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

0 5 MAY 2022    पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘जागर शाहू कर्तृत्वाचा’ विषयावर आज शहरात शंभर ठिकाणी व्याख्याने

**विवेकानंद महाविलयात ‘शाहू जीवनकार्य’ विषयावर पालकमंत्री सतेज पाटील यांचे व्याख्यान ■ शिवाजी विद्यापीठात ख्यातनाम अर्थ व कृषितज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांचे व्याख्यान**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त गुरुवार, ५ मे रोजी सकाळी ११ वाजता जिल्ह्यात ‘जागर शाहू कर्तृत्वाचा’ या विषयावर राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जीवनकार्याविषयी एकाच वेळी शंभर व्याख्यानांचे आयोजन केले आहे. या विशेष व्याख्यानमालेमध्ये शाहू महाराज यांचे कार्य आणि योगदान लोकांना कळावे. खास करून विद्यार्थ्यांच्या मनात शाहूंचे विचार रुजावेत, यासाठी विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथे पालकमंत्री सतेज पाटील यांचे व्याख्यान होणार आहे.

### महापालिकेच्या वतीने विविध कार्यक्रम

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दीनिमित्त महापालिकेच्या वतीने शुक्रवार, दि. ६ मे रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सकाळी साडेआठ वाजता नर्सरी बाग येथील राजर्षी छत्रपती शाहू समाधीस्थळ व दसरा चौक येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना सकाळी १० वाजता १०० सेकंद स्तब्ध उभे राहून कृतज्ञता व्यक्त केली जाणार आहे. तसेच इतर कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी आपापल्या कार्यालयामध्ये १०० सेकंद स्तब्ध उभे राहणार आहेत. महापालिकेच्या चौकामध्ये अग्निशमनचे जवान सकाळी १० वाजता एकत्र जमून १०० नंबरची प्रतिकृती तयार करणार आहेत. महापालिकेच्या शाळा व कॉलेजमध्ये विद्यार्थी, शिक्षक व त्यांचे शाळेत आलेले पालक शाळेच्या ग्राऊंडवर १०० सेकंद स्तब्ध उभे राहणार आहेत. विभागीय कार्यालयांतर्गत सोसायटी, कॉलनी व गृहनिर्माण संस्था यांच्या सहभागासाठी नोडल अधिकारी, कर्मचारी म्हणून नियुक्त्या केलेल्या आहेत. संबंधित नोडल अधिकारी, कर्मचारी आपल्या कार्यक्षेत्रातील सोसायटीचे चेअरमन व माजी पदाधिकारी व नगरसेवक यांच्याशी समन्वय साधून सकाळी १० वाजता सामूहिक कार्यक्रमात सहभागाबाबत जनजागृती करणार आहेत. या उपक्रमात कोल्हापूरवासीयांनी प्रतिसाद देऊन सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांनी केले आहे.

### शाहूरायांच्या जीवनकार्याचा विद्यापीठात पथनाट्यातून जागर

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित सप्ताहांतर्गत बुधवारी राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यावर आधारित विशेष पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. पथनाट्य विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सादर केले.

### शहरात स्वच्छता मोहिम

महापालिकेने विविध स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयाने शहरात स्वच्छता मोहीम राबविली. यामध्ये शहरातील प्रेक्षणीय स्थळे, वारसा स्थळे, मुख्य रस्ते, चौक या ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेत एक टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. महापालिका प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या मार्गदर्शनखाली ही स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. ही मोहीम पंचगंगा नदी घाट परिसर, अंबाबाई मंदिर, कोटीतीर्थ तलाव, शाहू समाधीस्थळ, छत्रपती शिवाजी विद्यापीठ मेनरोड, रंकाळा, मध्यवर्ती बसस्थानक ते रेल्वे स्टेशन व टेंबलाई मंदिर परिसरात करण्यात आली. या मोहिमेत प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांनी उपायुक्त रविकांत आडसूळ यांच्यासह शाहू समाधीस्थळ, रंकाळा टॉवर व पंचगंगा नदी घाट परिसर या ठिकाणी फिरती करून स्वयंसेवी संस्थांसमवेत स्वच्छता केली.

### शाहू स्मृती शताब्दी पूर्वसंध्येला आज कँडल मार्च

शाहू स्मृती शताब्दी पूर्वसंध्येला गुरुवार, दि. ५ मे रोजी सायंकाळी ७ वाजता दसरा चौक ते शाहू समाधीस्थळ या मार्गावर कॅन्डल मार्च काढण्यात येणार आहे. या कॅन्डल मार्चमध्ये शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या कोल्हापुरातील सर्व समाजाच्या बोर्डिंगमधील विद्यार्थी हे सायंकाळी सात वाजता दसरा चौक येथील शाहू महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करणार आहेत.




### १०० सेकंद स्तब्धता पाळा

**कागल :** लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दीनिमित्त लोकराजाला वंदन करण्याकरिता शुक्रवार, दि. ६ मे रोजी सकाळी १० वाजता १०० सेकंद स्तब्धता पाळली जाणार आहे. आम्हीही १०० सेकंद स्तब्धता पाळून छत्रपती शाहू महाराजांना आदरांजली वाहणार आहोत. तुम्हीही स्तब्धता पाळून छत्रपती शाहू महाराजांना आदरांजली वाहवी, असे आवाहन दिलीपसिंह घाटगे स्मृती निवासी कर्णबधिर, कागल विद्यालयातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व शाळेतील कर्णबधिर विद्यार्थ्यांच्या वतीने सर्वांना करण्यात येत आहे.

### राजर्षी शाहूंचे विचार जोपासू : पोलीसप्रमुख

कोल्हापूर राजर्षी शाहू महाराज यांची भूमी आहे. सध्या शाहू स्मृती शताब्दी वर्षानिमित्त कृतज्ञता पर्व सुरू आहे. नागरिकांनी यापुढेही शाहूंच्या विचारांना बाधा पोहोचेल असे कृत्य करू नये, असे आवाहन जिल्हा पोलीसप्रमुख शैलेश बलकवडे यांनी केले. बलकवडे म्हणाले, शाहूंच्या विचाराने वाटचाल करणाऱ्या करवीरवासीयांनी शांतता राखून सलोख्याचे दर्शन घडवले. तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

सकाळ

# 'जागर शाहू कर्तृत्वा'चा वर आज शंभर ठिकाणी व्याख्याने

**कोल्हापूर :** लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त उद्या (गुरुवारी) सकाळी ११ वाजता जिल्ह्यात 'जागर शाहू कर्तृत्वाचा' या विषयावर एकाच वेळी शंभर व्याख्यानांचे आयोजन केले आहे. विवकानंद महाविद्यालयात पालकमंत्री सतेज पाटील यांचे व्याख्यान होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहात मुख्य व्याख्यान होणार असून अर्थ व कृषी तज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात संवाद साधतील. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के रुकडी येथील राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयात तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील हे चंदगड येथील आर. बी. माडखोलकर महाविद्यालयात व्याख्यान देणार आहेत. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे कराड येथील एस. जी. एम कॉलेजमध्ये व्याख्यान देतील.

सकाळ

# भवानी मंडपात उद्या होणार युवा जागृती पथनाट्य

कोल्हापूर : राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त 'वारसा राजर्षी शाहूंचा, जागर युवाशक्तीचा' या माध्यमातून भवानी मंडपात सकाळी आठ वाजता पथनाट्य सादरीकरण होणार आहे. शिवराज्याभिषेक महोत्सव समिती, शिवाजी विद्यापीठराष्ट्रीय सेवा योजना व माध्यमिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विविध महाविद्यालय व माध्यमिक शाळांच्या माध्यमातून शाहू महाराज यांच्या जीवन व कार्यावर आधारित १०० मिनिटांचे पथनाट्य सादरीकरण या वेळी होईल. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे १००० स्वयंसेवकही सहभागी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
05 MAY 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात महाविद्यालयांचे बिंदुनामावली तपासणी शिबिर

**कोल्हापूर, ता. ४ :** शासनाच्या निर्देशाप्रमाणे शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांसाठी विशेष कक्षाचे बिंदुनामावली तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे.

राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या १२ डिसेंबर २०२१ च्या शासन निर्णयानुसार संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील १ ऑक्टोबर २०१७ रोजीच्या मंजूर पदांच्या संख्येवर प्राचार्य व सहायक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदे भरण्यावरील निर्बंध शिथिल करण्याबाबतचे आदेश आले आहेत.त्यास अनुसरुन शिवाजी विद्यापीठाने शिक्षक पदांच्या भरतीबाबत बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी युद्धपातळीवर करण्याचे ठरविले आहे. त्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील बिंदुनामावली तपासण्यासाठी उपकुलसचिव, विशेष कक्ष यांच्या कुशल नेतृत्वाखाली दोन पथके तयार केली आहेत.

या पथकांद्वारे सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या महाविद्यालयांतील बिंदुनामावलींची प्राथमिक तपासणी सोमवार (ता. ९) ते शुक्रवार (ता. १३) अखेर शिवाजी विद्यापीठ, कार्यालयात कार्यालयीन वेळेत होणार आहे. त्याच्या वेळापत्रकासह, आवश्यक कागदपत्रांची यादी व प्रपत्रांसह परिपत्रक शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील मुखपृष्ठावर व विशेष कक्षच्या लिंकवर उपलब्ध आहे, असे आवाहन डॉ.पी. एस. पांडव, केले आहे. शिवाजी विद्यापीठाने शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करून उपरोक्तप्रमाणे तपासणी मोहीम हाती घेतली आहे.

> **“ शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे बिंदुनामावली प्राथमिक तपासणी करणे, जाहिरात मसुदा मंजुरी देणे, विद्यापीठ निवड समिती, शिक्षक मान्यता आदी सर्व बाबींची पूर्तता शासनाने दिलेल्या विहीत वेळेत करण्याचे प्रयत्न राहतील. संबंधित महाविद्यालयीन प्रशासनाने त्यादृष्टीने सहकार्य करावे. विद्यापीठातील संबंधित अधिकारी व प्रशासकीय सेवक यांचे याबाबतीत सर्व सहकार्य राहील.**
>
> – **प्रा. डॉ. पी.एस.पाटील**, प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ.

0 5 MAY 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामंजस्य करारामुळे संशोधनाला चालना

## डॉ. बॅनर्जी; झुऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियासमवेत शिवाजी विद्यापीठाचा करार

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ४ :** शिवाजी विद्यापीठासमवेत भारतीय प्राणी सर्वेक्षण संस्थेच्या झालेल्या सामंजस्य करारामुळे विविध संयुक्त संशोधन प्रकल्पांना चालना मिळेल, अशी अपेक्षा झेड.एस.आय.च्या पहिल्या महिला संचालक डॉ. धृती बॅनर्जी यांनी येथे व्यक्त केला. विद्यापीठ व भारतीय प्राणी सर्वेक्षण संस्था (झेड. एस. आय.) यांच्यात प्राण्यांविषयी आधुनिक पद्धतीने अभ्यास करण्यासाठी पाच वर्षांचा सामंजस्य करार नुकताच केला. त्यावेळी त्या बोलत होत्या.

डॉ. बॅनर्जी म्हणाल्या, ''झेड. एस.आय.च्या देशातील विविध केंद्रांमध्ये उपलब्ध प्राण्यांचे नमुने आणि अवशेष यांचा अभ्यास करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना नवे दालन खुले झाले आहे. त्याचा संशोधन विकासासाठी निश्चितच उपयोग होईल.''



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभाग आणि प्राणी सर्वेक्षण संस्थेत सामंजस्य करार झाला. याप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. धृती बॅनर्जी, डॉ. ए. ए. देशमुख यांच्यासह अन्य शिक्षक व अधिकारी.**

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, ''दोन्ही संस्थांमधील विद्यार्थी, शिक्षक व संशोधक यांनी या करारांतर्गत संशोधन करून प्राणी संवर्धन व समाजोपयोगी स्वरुपाचे काम करावे. प्राणिशास्त्राबरोबरच अन्य विषयांतील संशोधकांना सुद्धा यात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करावा, जेणे करून कराराची व्याप्ती अधिक वाढेल आणि संशोधनाचा परीघही विस्तारेल.''



सामंजस्य कराराबाबत माहिती देताना डॉ. एस. एम. गायकवाड म्हणाले, ''झेड.एस.आय.चे संशोधक व शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्राध्यापक आणि प्राणिशास्त्राचे पदव्युत्तर व संशोधक विद्यार्थी यांच्यात संशोधनाच्या कामाची देवाण-घेवाण करण्याच्या उद्देशाने करार केला आहे. त्याचबरोबर दोन्ही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा, चर्चासत्रे, परिषदा व संशोधन प्रकल्पही राबविण्यात येणार आहेत. या करारांतर्गत खास करून पश्चिम घाटातील जैवविविधतेवर संशोधन होणार असल्याने पश्चिम घाटातील जैवविविधता अधिक प्रकर्षाने अधोरेखित होईल.''

करारावर परीक्षा नियंत्रक गजानन पळसे व झेड.एस.आय.च्या संचालक डॉ. धृती बॅनर्जी यांनी स्वाक्षरी केली. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, प्राणीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. ए. ए. देशमुख, झेड.एस.आय. (पुणे)चे ऑफिस इनचार्ज डॉ. बासुदेव त्रिपाठी आणि प्राणीशास्त्र अधिविभागातील शिक्षक, संशोधक उपस्थित होते.

तरुण भारत

# राजर्षी शाहूंच्या जीवनकार्यावर उद्या १०० मिनिटांचे पथनाट्य

प्रतिनिधी

कोल्हापूर

राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी वर्षानिमित्त शुक्रवारी, ६ रोजी सकाळी ८ वाजता शाहूंच्या जीवन-कार्यावर आधारीत शंभर मिनिटांच्या पथनाट्याचे सादरीकरण केले जाणार आहे. पथनाट्यात आठवी ते बारावी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी होणार आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांचाही सहभाग आहे.

'वारसा राजर्षी शाहूंचा, जागर युवाशक्तीचा" यातून शिवराज्याभिषेक महोत्सव समिती, शिवाजी विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व माध्यमिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या पथनाट्याचे आयोजन केले आहे. 'वारसा राजर्षी शाहूंचा, जागर युवाशक्तीचा" पथनाट्य सादरीकरण होणार आहे.

तरूण भारत

# साजन पिटुक बनला सीमा सुरक्षा रक्षक

प्रतिनिधी
कोल्हापूर

▪ 'कमवा आणि शिका' योजनेतील विद्यार्थ्याचा प्रवास

शिवाजी विद्यापीठातील डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन मधील 'कमवा आणि शिका' योजनेअंतर्गत काम केलेले विद्यार्थी साजन पिटुक यांची सीमा सुरक्षा दलात निवड झाली. नुकतीच त्यांची दिल्ली येथे कसम परेड घेण्यात आली.

चंदगड तालुक्यातील माणगावातील साजन यांच्या घरची परिस्थिती हालाखीची असल्याने त्यांनी 'कमवा आणि शिका' योजने अंतर्गत दूरशिक्षण विभागामध्ये काम केले. विद्यापीठातील वाणिज्य अधिविभागातून त्यांनी अकाऊंटन्सी विषयातून पदव्युत्तर शिक्षण घेतले. प्राथमिक शिक्षण गावातील केंद्रीय प्राथमिक शाळेतून तर माध्यमिक शिक्षण छत्रपती शिवाजी हायस्कूलमध्ये झाले. अकरावी-बारावीचे शिक्षण बी. डी. ज्युनिअर कॉलेजमध्ये घेतले. डी. एड. पदवीचे शिक्षण तुर्केवाडी येथे घेतले. पदवीपर्यंतचे शिक्षण कार्वे येथील महाविद्यालयात झाले. पदव्युत्तरचे शिक्षण शिवाजी विद्यापीठात झाले. त्यांच्या या निवडीबद्दल आजी-माजी विद्यार्थी, भवनचे मुख्य अधीक्षक डॉ. एन. एल. तरवाळ, सहायक अधीक्षक डी. एच. भादले, डॉ. एम. व्ही. वाळवेकर यांनी अभिनंदन केले.

**कमवा व शिका योजनेचा आधार**

अतिशय दुर्गम अशा चंदगड तालुक्यामधुन येऊन जिद्दीने तसेच प्रामाणिकपणे 'कमवा आणि शिका' योजनेच्या आधारावर पदव्युत्तर शिक्षण घेतले. भारतमातेची सेवा करण्याची संधी मिळाली. त्यामुळे आतापर्यंत घेतलेल्या कष्टाचे चीज झाले. सर्व सहकारी व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

**- साजन पिटुक (विद्यार्थी)**